ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org


| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | सत्वशील श्रियाळ-चांगुणा-चरित्र |
| लेखक | : | हरी विठ्ठल धावडे |
| प्रकाशक | : | पुरंदरे आणि कंपनी, मुंबई |
| प्रकाशन वर्ष | : | १९१३ |
| मूळ ग्रंथ प्रत | : | शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे |

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर - २०२४

सत्वशील

# श्रीयाळ राजाचें चरित्र.



किंमत २ आणे.

श्री.

सत्वशील.

# श्रियाळ-चांगुणा-चरित्र.

हें पुस्तक,

हरी विठ्ठल धावडे

यांनीं लिहिलें तें

रा. चिं. स. देवळे यांनीं सदाशिव गल्ली घर नं. १,
येथें 'मुंबईवैभव' छापखान्यांत छापिलें.

पुरंदरे आणि कंपनीकरितां

रा. विनायक दादोबा पुरंदरे यांनीं माधवबाग येथें
प्रसिद्ध केलें.

शके १८३५-सन १९१३.

सत्वशील

# श्रियाळ-चांगुणा-चरित्र.

नैमिषारण्यांत ऋषिजन कथा सांगतात–ज्याला कैलास भुवन म्हणतात, तेथें वास करणारा, त्यास शंकर असें नांव आहे त्याच्या प्रतापाची थोरवी काय वर्णन करावी ? तोच ब्रह्मांडरचना व त्रैलोक्याचें भस्म करितो. त्याच्याजवळ विष्णु दिवाणगिरी करितो, इंद्र चवरी वारितो, ब्रह्मदेव पुरोहित, व देव सेवक होऊन कामें करितात. तीथें रंकासारखीं झाडलोट करितात, सात समुद्र मूर्तिमंत उभे आहेत, वरुण पाणी भरतो, हिमालय वारा घालतो, अग्नि स्वयंपाक करितो, षण्मुख पंक्ति वाढतो, विनायक विडे देतो, सरस्वती पिकदाणी धरिते; चार वेद, अठरा पुराणें, सहा शास्त्रें नाम गातात, त्याच्याच आज्ञेनें शेषानें मस्तकावर पृथ्वी धरिली आहे. त्याच्या अर्धांगीं विश्वजननी गिरिजा भवानी बसली आहे. त्या दीनदयाळ त्रैलोक्यनाथासारखा समर्थ कोणी नाहीं.

एके दिवशीं नारदमुनि शंकराकडे येऊन ह्मणाला—मृत्यु-लोकीं कांतिनगरांत श्रियाळराजा व त्याची चांगुणा नांवाची स्त्री तुझी भक्ति करून, आपला प्राण वेंचित आहेत. त्या दानशूर व उदार राजानें दहा हजार वर्षें अन्नसत्र चालविलें असून, अतीतांस इच्छाभोजन देत असतो; पृथ्वीवरील अप्राप्त वस्तु जरी भोजनीं मागितली तरी ती आणून देतो. त्याच्या चांगुणा स्त्रीनें पवित्र वंशांत जन्म घेऊन, सत्वाची ध्वजा लाविली आहे.

असें नारदाचें वचन ऐकताच, शंकरास आश्चर्य वाटून, तो भिकाऱ्याच्या वेषानें जोगी बनून, श्रियाळचांगुणेच्या घरीं गेला. राजानें त्यास सन्मानानें मंचकावर बसविला, जोगी आल्याचें चांगुणेस कळतांच, ती कनकपात्रांत उदक घेऊन आली व तिनें त्याचे पाय धुतले. नंतर उभयतांनीं भोजन करण्याबद्दल आग्रह केला. तेव्हां जोगी म्हणालाः—मी मांसअहाराशिवाय अन्न भक्षण करित नाहीं. मला पशुमांस नको नरमांसाच्या पाकानें माझी तृप्ति होईल. राजा तुझ्या चिल्हयाबालाचें मांस भक्षण्याचा माझा हेतु आहे. त्याचा उभयतांनीं वध करावा; नेत्रांतून अश्रुपात केल्यास पात्राचा त्याग करीन.

असें शंकराचें वचन ऐकतांच, राजा दचकून स्त्रियेस म्ह-

णाला–प्राणवल्लभे ! या संकटांतून आतां कसें निघावें ? चांगुणा म्हणाली–सत्व सांडलें असतां, नरकवास भोगावा लागेल. मनुष्यजन्मास येऊन सर्व आयुष्य ईश्वराचे भक्तींत वेचावें. एरवीं सगळें मृगजळासारखें असून, शाश्वत कांहींच नाहीं, जितकें दिसतें तितकें नाशिवंत आहे; असें वेदव्यासांनीं वर्णिलें आहे;यास्तव मोहपाश तोडून शिवपदीं निश्चय धरावा. तपस्व्यास विन्मुख पाठविल्यास सुकृताच्या राशी घेऊन जाईल. फक्त देह राहील त्यास काळ ग्रासून टाकील. मेल्यावर चौऱ्याशीं नरक भोगावे लागतात, याचा विचार करून जन्माचें सार्थक करावें.

राजा ह्मणाला–तूं ह्मणतेस तें खरें, परंतु वंशांत एकच बाळ जन्मलेला त्याला कसें वधावें ? भांडवलाचें रक्षण करून व्यवहार करावा, मुहूर्त पाहून कार्य साधावें,– उगवलेला कोंब उपटून टाकून, फळाची इच्छा करावी, चाकाचा अक्ष मोडल्यावर गाडा कसा चालेल ? विश्वामित्रानें अमरपुरी घेण्याकरितां साठ हजार वर्षें तप मांडलें. तेव्हां इंद्रानें मेनकेस सांगितलें कीं, तूं कर्मभूमीला जाऊन ऋषीच्या तपाचा भंग कर. ती ऋषीच्या गुंफेजवळ येऊन, समोर एक तळें होतें, त्याच्या पाळीवर वस्त्र फेडून ठेवून, त्यांत क्रीडा–गायन करीत ऋषीस अवयव दाखवूं लागली.

ऋषीनें तिच्याकडे तटस्थ मुद्रा लावितांच, त्याच्या अंगीं मदनानें संचार केला. त्याबरोबर ऋषि आसन सोडून तिच्याजवळ जाऊन, तूं कोण, कोठची, कोणाची स्त्री, एकटीच क्रीडा कां करतेस ? असें विचारूं लागला.

मेनका ह्मणाली—हें विचारण्याचें तुह्मास कारण कोणतें ? असें बोलून गदगदां हांसली. त्यामुळें मुनीचा मदन खवळून जवळ जाऊन हळूच ह्मणाला—आतां गुंफेंत चल, तुला खावयास फळें देतों. ती ह्मणाली—मी परपुरुषाबरोबर भाषण करित नाहीं. नंतर ऋषीनें हनुवटीस हात लावून ह्मटलें—तुला काय आवडतें ? मेनका बोलली—सर मागें, तुला लज्जा वाटत नाहीं ? विश्वामित्र कामानें व्यापल्यामुळें त्यानें तपश्चर्या, ध्यान विसरून, दोन्ही हातांनीं कवळून तिचें चुंबन घेतलें व उचलून कडेवर घेऊन, आपल्या पर्णकुटिकेंत नेऊन भोग देऊन तपसामग्री बुडाविली. ऋषीचें भांडवल सरलें असें मेनकेस वाटतांच, आपलें लुगडें सांवरून गुंफेच्या बाहेर निघाली, तोंच विश्वामित्रानें तिचा पदर धरिला. त्याला मेनका ह्मणाली—तुझी बुद्धि चळली कीं काय ? एकटी स्त्री पाहून बळेंच अंगास झोंबतोस ? तुला जर एवढा विषयाचा चाळा, मग ऋषिवेष कां घेतलास ? संसाराचा व्यवसाय सोडलास

त्यामुळें धड प्रपंच ना परमार्थ असें झालें. सुंदर स्त्री करावयास तुला आडकाठी कोणी केली होती ? वनांत लंगोटी लावून बसलास मग कायेची विटंबना कां केलीस ?

असे शब्दबाण मारून मेनका स्वर्गास निघून गेली. मग ऋषीस आठवण होतांच, भांडवल बुडविलें असें ह्मणूं लागला आणि पश्चात्तापानें ह्मणाला. अरे पापिष्ठा कामा, जोडलेले कष्ट धुळींत घातलेस ! स्वल्पासाठीं तं मध्येंच अनर्थ कोठून आणलास? बहुत कष्टानें जोडलेल्या धनाचें गाठोडें चोरानें चोरून न्यावें, तसें विश्वामित्रास होऊन हात चोळित बसला. यास्तव प्रिये ! अचाट नेम धरूं नको पोटीं एक अंश आहे तो दिला असतां निर्वंश होत आहे. आम्ही मेल्यावर क्रिया कोण करील ? असें नवऱ्याचें वचन ऐकतांच चांगुणा ह्मणाली—मोक्षफळ सांडून नरकाची इच्छा कां करितां? हरिश्चंद्र तारामतीची कीर्ति ऐकिलीच असेल, त्यांनीं व पुण्यशील नळदमयंती यांनीं सत्त्व राखिलें ह्मणूनच त्यांचा उद्धार झाला. याविषयीं मी गोष्ट सांगतें ऐका.

श्रुतिसेन नांवाचा एक पराक्रमी व कीर्तिवान् राजा पृथ्वीचें राज्य करित होता. त्याच्या हजार स्त्रिया होत्या परंतु वंशास पुत्रसंतान झालें नव्हतें. त्यानें देवांस पुष्कळ नवस केले तरी पुत्र लाभला नाहीं. त्या योगें राजा उद्विग्न होत्साता बसला अ-

सतां एक ऋषि राजवाड्यांत आला. त्याचें राजानें आदरातिथ्य व पूजन करितांच, ऋषि संतोषून ह्मणाला—राजा, कांहीं वर माग. जें हरिहरासहि देववणार नाहीं तें मी तुला देईन. राजानें त्याची शकुनगांठ घालून ह्मटलें—योगींद्रा ! मी दैवयोगानें राज्यपद पावलों, हजार स्त्रिया केल्या, परंतु वंशास पुत्रसंसंतान नाहीं. यास्तव आपल्या कृपेनें पुत्रप्राप्ती व्हावी. असें ऐकून एक फळ त्याचे हातांत देऊन योगी विजेसारखा त्याच क्षणीं गुप्त झाला. राजानें तें फळ आवडत्या राणीस दिलें. तिनें तें खाल्यावर अल्पकाळांतच गरोदर राहून नवमास भरतांच पुत्र प्रसवली. तेव्हां राजाला आनंद होऊन लक्ष गाइ दक्षिणा ब्राह्मणांस दिल्या. हजार स्त्रियांत तीच स्त्री प्रिय असून राजाला तिचा एक क्षणाचाही वियोग सहन होत नसे.

राजाच्या हजार स्त्रियांस हें वृत्त कळतांच त्या म्हणाल्या—राजा पुत्रवतीस लुब्ध होऊन आम्हांपासून दूर झाला. तरी त्या पोरास विष घालून ठार मारूंया. असा त्यांनीं सवतीमत्सर धरून मुलास ठार मारण्याचा निश्चय केला. त्या नेहमीं मुलास खेळवावयास घेऊन येत असत. एके दिवशीं मुलगा आईच्या पुढें निजला होता व आईसही झोंप लागली होती त्या संधींत मुलास उचलून आणून त्याला विष पाजून परत आई-

जवळ नेऊन ठेविला. तो त्या विषानें जागच्या जागीं मरण पावला. आई जागृत झाल्यावर पाहते तों बाळकास काळानें ग्रासलें आहे. तेव्हां ती कपाळ पिटून शोक करूं लागली. ती वार्ता राजास कळतांच, तोही मूर्च्छित होऊन दुःखसमुद्रांत पडला. तो म्हणाला. हे ब्रह्मदेवा! माझ्या कपाळीं काय लिहिलेंस? माझ्या पदरीं काय पाप होतें म्हणून मला दुःखसागरांत लोटून दिलेंस! असें बोलून जमिनीवर पडला. नगरांतील लोकांनीं आकांत केला.

हें नारद मुनीनें जाणून राजाजवळ येऊन सावध करून म्हटलें राजा! मेलेल्या पुत्रासाठीं काय रडतोस? असा चिरंजीव कोण झाला आहे? हरिहरांसही मृत्यु लागला आहे मग मानव जन अमर कसा होईल? घर, दार, वैभव, संतति, संपत्ति यांकरितां विचारवंतानें उदास वृत्तीनें असावें हा सर्व लटका व्यवहार आहे. वैभव, संपत्ति असली म्हणजे परके आप्त होतात व द्रव्य सरल्यावर सखे सोयरे नांव घेत नाहींत. द्रव्यवान् पुरुषासमोर स्त्री दासीप्रमाणें वागते व दरिद्र प्राप्त होतांच, स्त्री पिशाचासारखी होते. तूं माझें राज्य म्हणतोस परंतु तें काळाचा खाद्य पदार्थ आहे. यासाठीं लौकिकाचार सांडून जिवाचें सार्थक कर. तूं कोठून आलास व कोठें

जावयाचें हें मूळ शोधून मनांत विचार कर. जसें राहाटाचे लोटे एक भरतो व एक रिकामा होतो, तसे जन्ममरणाचे फेरे आहेत. असंख्य योनी हिंडतां हिंडतां प्राण्यास कोठेंही विश्रांति नाहीं. परमेश्वरानें मनुष्यखाणी निर्माण केली ती अहंता सर्पाच्या फुंपाट्यानें नागवली आहे. जीव चौऱ्याशीं-च्या फेऱ्यांत पडतांच, त्याला सुख दुःखाचे आंचके बसतात तेथून काढणारा एक सद्गुरु समर्थ होय. जे सद्गुरूच्या कांसेस लागले ते सायुज्यमुक्तीस गेले. व जे चुकले त्यांस संसाररूपी खोल पाण्यांत विकल्परूप मासे तोडतात. जिवंतपणीं संसाराचा घोर व मेल्यावर यमाचे प्रहार, असे चोंहोंकडे दुःखाचे डोंगर आहेत.

असा नारदाचा बोध ऐकतांच, राजाचा मोह जिरून अंतर सद्गद झालें. परंतु पुत्रशोकामुळें किंचित् कलंक राहिला होता. मग नारदानें अमृत दृष्टीनें पाहतांच, निर्जीव बालक जिवंत झालें. त्यास पाहतांच सर्व लोकांस व राजास आश्चर्य वाटलें. नंतर नारद बालकास म्हणाला—बाळा ! तुझ्यासाठीं तुझा बाप शोकसागरांत बुडाला आहे त्याची उठून समजूत कर. मुनीचें वचन ऐकतांच, तें बालक हांसून राजास म्हणालें-हे सुजाणा! तुझें काय हरवलें ? कोणी राज्य घेतलें किंवा शरीर जरेनें व्यापलें- किंवा युद्धांत घावलागले म्हणून दुःख करतोस ? तूं मा-

ण्यासाठीं रडतोस हें तुझें मूर्खपणाचें लक्षण होय. जीव हा मायेच्या आधीन असून तीच माया कुडींत घालते व काढते. एखादा वाटसरू नगरांत वस्तीला राहावा व तो उजाडल्यावर मार्गास लागावा व त्याचा नगरांतील लोकांनीं शोक करावा तसा हा विचार मला दिसतो. राजा! आणखी एक नवल सांगतों ऐक.

एका सावकारानें आपल्या मुलास व्यापारास पाठविला, तो एका नगरांत वस्तीस राहिला. तेथें जवळच एक वेश्या राहत होती, तिचें गायन ऐकतांच, सावकारपुत्र झोंपेंतून उठून तिच्या घरीं गेला, त्याचें तिनें आदरातिथ्य करून म्हटलें—तुमच्याशिवाय दुसरा पुरुष आजपर्यंत मी डोळ्यांनीं पाहिला नाहीं. असें ऐकतांच, त्याला मोह उत्पन्न होऊन, हा जीव मी तुझ्या स्वाधीन केला आहे असें बोलून द्रव्य अर्पण करून सहा महिनेपर्यंत तेथें राहिला. इकडे बाप पुत्राची चिंता करूं लागला. मग गुमास्त्याला त्याच्या शोधास पाठविला तो त्याच गांवांत येऊन वस्तीस राहिला. एक प्रहर रात्र होतांच, तोही गायन ऐकून तिच्या घरीं गेला. तों सावकारपुत्र त्यास आढळला. मग परस्परांची ओळख पटून एकमेकांस भेटले. गुमास्ता त्यास म्हणाला—तुझा बाप तुजकरितां दुःख करित असून, मला शोधाकरितां पाठविलें आहे. सावकारपुत्र

म्हणाला—ही वेश्या पतिव्रता असून, माझ्याशिवाय दुसरा भर्ता हिनें दृष्टीनें पाहिला नाहीं हिची निष्ठा माझेवर आहे; यास्तव मी गेलों असतां ती प्राण ठेवणार नाहीं.गुमास्ता म्हणाला—तूं मजबरोबर बाजारांत चल व मला माल भरून देऊन मग सुखानें रहा. तें वचन त्यानें मान्य करून दोघे बाजारांत गेले. तेथें गुमास्त्यानें धन्याच्या मुलास एका पेटींत घालून,वेश्येच्या मंदिरांत ती पेटी घेऊन आला व तिला म्हणाला—तुझ्या मित्रानें अमूल्य वस्त्रें तुजकरितां पाठविलीं आहेत, तरी त्या मित्राचें नांव घेऊन ही पेटी घरांत नेऊन ठेव. तेव्हां वेश्या म्हणाली—मी लक्ष पुरुषाची मैत्री केली आहे, त्यांत नांव कोणाचें घेऊं? पण त्यांत दहाहजार नामांकित होते.

असें ऐकून गुमास्ता उगाच राहिला. तों तिला राग येऊन ती ह्मणाली—कोणी चांडाळ आला असेल, त्याचें नांव मला आठवत नाहीं. असें पेटींतील सावकारपुत्रानें ऐकतांच, त्याला दचका बसून, मनांत ह्मणाला—या वेश्येनें मला मोहिनी घालून फसविलें! नंतर गुमास्ता ह्मणाला—ऐकिला हिचा वृत्तांत? तुझें नांव हिला आठवत नाहीं. मग त्याला बोध करून घरीं आणिला. असा दृष्टांत बालकानें राजास सांगून ह्मटलें—तुह्मीं पुत्रमोहवार्ता सोडून श्री अनंतास भजून आ-

पली जन्मसार्थकता करून घ्या. माझें शरीर ह्मणणें हेंच तुह्मांस पिसें लागलें आहे. मृगजळाचा उल्हास धरून धान्य पेरूं पहात आहां, कोळी मासे धरावयास मध्यरात्रीं गंगेवर गेला: व चंद्रबिंब पाण्यांत पाहून मनांत हर्षित होत्साता ह्मणाला—आज येथें अपूर्व वस्तु कोठून आली ? मग जाळें टाकतांच पाणी हाललें, त्याबरोबर कोळ्यास वाटलें कीं, मासा पळावयास पहात आहे ह्मणून विशेष बळकटीनें जाळें धरलें आणि मनांत विचार केला कीं, आज अमूल्य वस्तु सांपडल्यामुळें माझ्या भाग्यास अंत नाहीं ह्मणून आनंदित झाला. पुढें मध्यरात्र टळतांच, चंद्र अस्तास गेला. तों वस्तु निघून गेल्यामुळें अनर्थ झाला असें कोळ्यास वाटलें:

त्याचप्रमाणें राजा ! भ्रमूं नको पुत्र कोणाचा व बायको कोणाची ? तुह्मी हरिभजनाचे ठायीं आसक्त व्हा. असा पुत्राचा उपदेश ऐकतांच, राजा निष्कलंक होऊन, जगांत मी एक मूर्ख व मोहानें नाडलों असें बोलूं लागला. नंतर पुत्रास राज्यावर बसवून आपण स्त्रियांसह अरण्यांत जाऊन तपास बसला. पुढें त्याच्या अंतकाळीं विमान येऊन तो मोक्षधामास गेला.

नंतर दुसरें चरित्र सांगितलें—माळवा प्रांतांत उज्जनी नग-

रींत भूधर नांवाचा सदाचारी राजा धर्मनीतीनें राज्य करीत असे. त्याची बायको, पुत्र व सून अशीं चौघें जणें एकमतानें वागत असत. त्या सत्वशील राजाची कीर्ति ऐकून, सत्व पाहण्याकरितां नारदमुनी परमहंसवेषानें त्याच्या फुलबागेंत शिवाचें मंदिर होतें तेथें आला. त्याला पाहतांच सेवकांनीं राजास कळविलें तेव्हां नारदानें कौतुक करून त्याच्या पुत्राचा प्राण हरण केला. त्यावेळीं घरांत आकांत उडाला. दासी महाशंख करित सभेंत आल्या व राजास म्हणाल्या—महाराज ! राजपुत्र अकस्मात मरण पावला. हें अरिष्ट कसें झालें याचा शोध करावा. असें ऐकतांच, प्रधान, प्रजाजन अपार शोकांत बुडाले. राजा हर्ष शोक न मानितां उगाच बसला.

थोड्या वेळानें राजा म्हणाला—उगाच रडतां कां ? मरण पावलेला परत येत नाहीं मग त्याचा खेद कां करावा ? आत्मा गेल्यावर प्रेताचें दहन करावें यापेक्षां दुसरें साधन कोणतें तें सांगा पाहूं ? बरें, इकडे प्रेतसंस्कारास गुंतल्यास तो परमहंस निघून जाईल, यास्तव त्या साधूची भेट घेऊंया, मग प्रेतसंस्कार करूं असें बोलून राजा ऋषिजवळ आला व दर्शन घेऊन लोटांगण घातलें आणि हर्षानें विनवणी केली कीं, महादारिद्र्यानें पीडल्यावर गृहांत लक्ष्मीनें प्रवेश करावा किंवा कर्जानें गांजलेल्यास देवतेनें परीस द्यावा, सावित्रीस यम भेट-

तांच, पतीचा प्राण परतावा तसा, स्वामीदर्शनानें जिवास संतोष वाटला. आपल्या भेटीनें संसारपाश तुटून सायुज्यपदीं बसेन तुम्ही दयेचे सागर असून दीनांवर करुणा करून जीवांचा उद्धार करण्याकरितांच पृथ्वीवर फिरत असतां. आतां आश्रमांत येऊन आश्रम पवित्र करावा.

राजाचें हें धैर्ययुक्त भाषण ऐकून, मुनी आश्चर्य पावून ह्मणाला—राजा! तुझा कर्ता पुत्र मेल्यामुळें घरांत शोकसागर उंचवळला आहे, तेथें मी कशाला येऊं? आह्मी सुखस्वानंदीं निमग्न असतां, तुझ्या घरीं दारुण शोक चालला आहे, तेथें आमचें येणें कसें घडेल? राजा ह्मणाला—शोक संताप हा खोट्या मायेचा बाजार होय. दोरीचा सर्प कांपत असला तर तो चावतो काय? शेतांतील बाहुलें पाहून हरणें पळूं लागतात, पण तें शेताचें राखईत काय? ती हरणांची कल्पना व्यर्थ होय. खडकाच्या धोंड्यास शेंदूर माखला तर त्याला महिषासुर ह्मणावें? बागुल मारण्यासाठीं सेनासमुदाय कशाला पाहिजे? मग जो मुळींच जन्मला नाहीं तो मेला हा शोक कां करावा? स्वप्नांत पाहिलेलें ऋण जागृतींत फेडावें लागतें काय? जन्मला कोण व मेला कोण? हा उगाच मायेचा गलबला जाणावा. व्यापाराला कर्ज काढावें व वाटसरूला जामीन

ठेवावा ? गांवांत साऱ्याची पट्टी आली तिची चिंता बेडकीला असावी ? तशी जगाची रहाटी पाहिली तर तो उगाच शोकाचा चावटपणा होय. वाटसरू येऊन गेला त्याचा शोक कोण करितो ? मातीची मूर्ति पाण्यांत बुडविली तिच्यासाठीं कोण रडतो ? तशीं स्वार्थासाठीं माणसें शोक करितात.

वाटसरू घरास आला, त्याला खजिन्यावर ठेवावा, त्यानें जर दगा दिला नाहीं तर मग खेद कां करावा ? याप्रमाणें कोणीएक प्राणी आमच्या घरांत जन्मून कटिदोरा न नेतां तत्काळ उठून आमची संपदा आमचेकडे जवळ ठेवून उदिमाला निघून गेला, त्याचा खेद मनांत कांहींच नाहीं. यास्तव स्वामी ! तुम्हीं आनंदानें चला. राजाचा असा दृढ निश्चय पाहतांच, मुनीस संतोष होऊन त्यास ह्मणाला—राजा ! तूं बरा विचार सांगितलास, पण तुझी बायको शोकसागरांत बुडाल्यामुळें, पुत्र मेल्याचा भ्रम तिला भारी झाला आहे; तेथें आम्हाला संतोष कसा होईल ? मग राजानें बायकोस बोलावितांच, ती येऊन म्हणाली—स्वामी ! घरास चला. जीवांस बोध करण्याकरितांच तुमचा अवतार आहे, तुमच्या दर्शनानें त्रिविधताप नष्ट होतात. मेघ जगासाठीं धांवतो, त्याच्यापेक्षां तुमची राहाटी जास्त आहे. तुम्ही कोटी जिवांचा उद्धार होण्याकरितां अविद्येची पेटी फोडून टाका. सूर्य अंधकार निरसून विश्वाचें

कार्य चालवितो व तुह्मीं अज्ञानतम निरसून ज्ञानाचा प्रकाश पाडितां, चंद्र तापाचें निवारण करून विश्वास शीतळ करितो व तुम्ही त्रिताप भंगून अक्षय्य शीतळ करितां, गंगा समुद्रास मिळण्यास जाते ती दोन्ही तीरांवरील लोकांस शीतळ करिते तशा तुम्ही दयेच्या राशी जग तारण्याकरितां फिरत असतां. आंधळ्याच्या नेत्रांवर सूर्य बसावा किंवा चंद्रमौळी भाविकांस भेटावा, तसा आमचा भाग्योदय होऊन लाभ झाला! आतां चला व अनाथांवर कृपा करून आनंदाचें स्वरूप दाखवा.

अशी राणीची विनंति ऐकतांच, नारद संतोषून ह्मणाला यांची अगाध कीर्ति समुद्रापेक्षांही खोल आहे. पुनः तिची कसोटी पाहाण्याकरितां मुनी ह्मणाला—तूं विचारानें बोलतेस खरी, परंतु घरांत अनर्थ ओढवला आहे. महास्त्रिये! तुझ्या पुत्राचें आयुष्य काळानें खंडून दुःखाचा पर्वत घरीं येऊन पडला आहे. असें नारद बोलतांच, राणीस हांसें येऊन ह्मणाली—स्वामी! अभ्रपटल आपोआप वितळल्यावर आकाशांत गर्जना राहात नाहीं. सर्प कांत टाकल्यावर मनांत खेद मानतो! चित्रें पोतेऱ्यानें सारवल्यावर त्यांसाठीं कष्टी कोण होतो? मुदीची लाख सांडल्यावर कोण रडतो? वृक्षाचीं पानें गळल्यावर तो त्यांचा खेद काय करतो!

झाडाच्या खांदीवर पक्षी बसल्यास तिला हर्ष नाहीं व उडून गेला तरी दुःख नाहीं. तसे हे प्रजाजन वस्तीस राहणारे वस्तीकरितां खेद करितात, हें त्यांचें मूर्खपण होय. नखकेंसांवर प्रीति असते, ते काढून टाकले तरी खेद नसतो. फळ लागल्यावर वेल सुकत नाहींत त्यांस तेज येतें. आपले दांत नित्य घांसल्यानें लखलखित दिसतात आणि ते पडल्यावर त्यांस कोण विचारतो ? तशी पुत्राची गोष्ट आहे.

पतिव्रतेचे हे बोल ऐकतांच, मुनीनें मस्तक डोलविलें आणि मनांत म्हणाला—हे कोण विचार हृदयांत सांठविले आहेत. नंतर राणीस बोलला—तूं म्हणतेस तें खरें परंतु तुझ्या सुनेवर अरिष्टानें कहर मांडला आहे. असें ऐकतांच सासूनें सुनेस बोलवितांच, पतिप्रेमाचा त्याग करून, ती ऋषीजवळ आली व नमन करून हात जोडून उभी राहून म्हणाली—आज सुदिन उगवून रंकाचे घरीं श्रीमंताची स्वारी आली! तहानेलेल्यास भागीरथी पावली! किंवा जनकाचे यज्ञसमाप्तीस नरनारायण प्राप्त झाले ! स्वामी! तुमचें पद कमल पाहतांच, तसें मला होऊन माझ्या संतापाची ऊर्मी उडून गेली. सुकलेल्या अंकुरास अमृतधार, चकोरास पौर्णिमा, पार्वतीस कैलासवासी, किंवा समुद्रास विष्णु जांवई मिळावा,

त्याप्रमाणें आह्मांस दुःख होऊन ही स्वामीचें मुख पाहतांच, प्रारब्ध दुःख उडून हर्ष कोंदून राहिला आहे. मनाची भ्रांति उडून चित्ताची चिंता हरण झाली! तरी मज दासीची सेवा घेण्यास स्वामी! आश्रमास चला.

समंतेचें वचन ऐकतांच, नारद मनांत ह्मणाला—हीं एकापेक्षां एक अधिक असून, ज्ञानविवेक कोंदला असें ह्मणतात. यांचें ज्ञान—वैराग्य अतर्क्य होय. मग नारद तिला ह्मणाला—तुझा पती मरण पावून तुला वैधव्य आलें, तरी आतां प्रेताचें दहन कर. ऋषिवचन ऐकून समंता ह्मणाली—हा पंचभूतांचा देह आहे यांत पुरुष कोण व स्त्री कोण? पंचभूतें समसमान असून, आत्मा आत्मीं नसतो. जीव प्राण हे कर्त्यानें नेमिले नाहींत. बुडबुडा उठून फुटला तो काय नाश पावला? तो पाण्यांतच सांठवतो. हा न्याय बुद्धिबळांच्या सोंगट्यांप्रमाणें होय. जीवाचा पती परमेश्वर, त्याला जी वरील तीच चतुर पतिव्रता! एरवीं सगळ्या स्त्रिया विधवा जाणाव्या. स्त्री, पुरुष ही कल्पना स्वप्नवत् होय. जन अज्ञानभ्रमानें भ्रमून भवचक्राच्या वाहुटळांत फिरतात; कोणी मेला नाहीं व कोणी जन्मला नाहीं. आत्मा एक सांठलेला दिसतो.

असें तिचें वचन ऐकतांच मुनीनें आशीर्वाद देऊन तिची

पाठ थोपटली. मग तिघांस हातांत धरून घरीं घेऊन आला. मुनीनें अमृतदृष्टीनें राजपुत्रास पाहतांच तो उठून बसला व मुनीस लोटांगण घालून ह्मणाला—स्वामी ! बरें कल्याण केलेंत. माझें पाप, दैन्य जाऊन मी जीवन्मुक्त झालों. नंतर चौघांनीं पाय धरितांच, मुनीनें आपलें रूप दाखवून वैकुंठीं गमन केलें आणि विष्णूस विमान पाठविण्यास सांगून, चौघांस पावन करून वैकुंठीं नेलें, असें भक्तीचें भूषण आहे.

आपण लावलेला भोपळा दुसऱ्यानें तोडून नेला असतां, आपले कष्ट व्यर्थ गेल्यामुळें खेद वाटतो. आणि तोच भोपळा जर संतोषानें एखाद्या सत्पुरुषास दान दिला तर देणाऱ्या घेणाऱ्यास समाधान वाटतें तेथें खेद कसा वाटेल ! मनांत मोह धरल्यानें कंठास काळफांस नसतो, मग जन्म मरणाच्या पंक्तींत कोठवर फिरावें ? मरणाची धडकी बसल्यानें, सर्व रोगांची कडकी उठून, देहाची कर्म मडकी फुटून जीव कालचक्रांत अडकतो. जो मेला तो गेला त्याचा सोबती कोण होतो ? उगाच गलबला मात्र करितात, आणि शेवटीं सुखसंतोषानें जेवतात जो मरतो त्याच्या तोंडांत माती पडते, असे एकामागें एक असंख्य जीव मरतात. त्यांस ठाव कोठेंही नाहीं. पुत्र जन्मल्यावर साखर वांटतात

व तो मेल्यावर शोकांत पडतात. स्वप्नांत मोहरांच्या घागरी सांपडल्यास, त्यांचा जागृतींत संतोष होतो. काय ? ही सगळी भ्रमाची खटपट आहे. मृगजळाच्या पाण्यानें साळी पिकवील तो पोट भरील, हा भ्रम व्यर्थ होय. स्वप्नांत पुत्र झाले व स्वप्नांतच मेले, त्यांचा हर्ष–शोक जागृतींत धरावा काय ? पिता, पुत्र, सासू सुना, पति, कांता हा बाहुलीचा खेळ होय. तीं कोणी कोणाचीं होत नाहींत. व शेवटीं कोणी सांगातीं येत नाहींत; फक्त धर्म येतो. मेल्यावर चंद्र–सूर्य आहेत तोंपर्यंत कीर्ति मात्र राहाते. तन, मन, धन, जीव, संसार ईश्वराचे ठायीं अर्पण करावा. ईश्वरास पुत्रफळ अर्पण केल्यानें अढळपद प्राप्त होतें व प्रळयकाळपर्यंत कीर्ति राहाते.

याप्रमाणें चांगुणेनें पतीची समजूत केल्यावर त्याला संतोष वाटून ह्मणाला–तुला जें आवडेल तेंच मी करीन. नंतर तिनें पुत्रास हाक मारतांच, तो पांच वर्षांचा बाळ धांवत येऊन मला उतावळीनें कां बोलाविलें. म्हणून विचारूं लागला. पुत्रवदन पाहतांच पोटांत करुणा येऊन बोलावयास शब्द फुटेना. तिच्या पोटांत मोहाच्या लाटा उसळूं लागल्या. परंतु सत्याची मर्यादा तिच्यानें उल्लंघवेना. मग मोहाची ऊकळी गिळून हृदयांत शंकरास आठवून, धैर्य धरून मंजुळ वाणीनें

मुलास म्हणाली वत्सा! तुजसाठीं महायोगी भिक्षेस आला असून तुझ्या देहाचें मांस भक्षण्याची त्याची इच्छा आहे.

असें ऐकतांच चिल्हयास आनंद होऊन तो म्हणाला—माझ्या भाग्याचा उदय झाला. दरिद्र्याचे कन्येला श्रीमंत वरण्यास यावा, तृषाक्रांतास अमृताचा समुद्र भेटावा, तसा माझ्या नाशिवंत देहाला सत्पुरुष गतीस लावित आहे. बहुत पुण्याच्या राशी जोडाव्या, तेव्हां नरदेहप्राप्ती होते. असा तो देह सत्पुरुषीं अर्पण केल्यानें सद्गती होईल आणि मोक्षासारखें धन जोडेल. शेळी ऐवजीं कामधेनु मिळाल्यास जो न घेईल तो मूर्ख समजावा. माते! यापेक्षां लाभ तो कोणता? मेल्यावर देहास दुर्गंधी घाण उठून तिला घरचीं मुलेंसुद्धां भिऊन दूर पळतात. केंस गवतासारखे भाजून, हाडें लांकडासारखीं जळतात. कपाळ भंगल्यावर मोक्ष झाला म्हणून लोक घरास जातात. जोंपर्यंत मसणवट्यांत बसलेले असतात, तोंपर्यंत वैराग्याच्या गोष्टी सांगून संसार नाशवंत असें म्हणतात. सृष्टि दुःखदायक असून सर्वांच्या पाठीस मृत्यु लागला आहे. काळ हट्टास पेटून कोणासहि जिवंत सोडीत नाहीं. यासाठीं साधुसेवा व भगवद्भजन करावें व जन्ममरण उल्लंघून सायुज्यास पावावें. आमच्या प्रारब्धांत तें कोठचें? आम्ही

संसारमोहाच्या कचाट्यांत सांपडलों असून, पदरीं पापांचा सांठा आहे, त्या आम्हांला देव कोठून आठवेल ?

अशा प्रकारें जोंपर्यंत लोक मसणवट्यांत बसले असतील तोंपर्यंतच मनांत वैराग्य उपजतें. घरीं आल्यावर तें वैराग्य नाहींसें होतें. अशा या जगाच्या रीतीमुळें चित्ताचा क्षणोक्षणीं पालट होतो. ज्यानें शाश्वतपदाची प्राप्ती होते तो अर्थ कोणता सांगा पाहूं ? आतां तुमच्या मनाचा निश्चय होऊन पूर्ण बोध होईल. असा इतिहास सांगतों ऐका.

वृत्रासुर नांवाचा पर्वतासारखा विशाळ देहाचा एक दैत्य होता, तो बोलला असतां, आकाश गडगडून देवांस भीति प्राप्त होत असे. त्याच्या चरणभारानें पृथ्वी खचून शेष वराह दचकून धैर्यानें पृथ्वी सांवरित असत. त्याचें हजार ताड लांब व जग सांठवेल एवढें तोंड असून, साठ योजनांची हातांत गदा होती. त्याच्या धाकानें देव पळून गेले, तेव्हां इंद्र विष्णूस शरण गेला आणि वृत्तांत सांगून आतां काय उपाय करावा ह्मणून विचारूं लागला. तेव्हां विष्णु ह्मणाला—त्याचें वर्म सांगतों ऐक. दधीचि ऋषीच्या अस्थी त्याजकडे मागून त्यांचें वज्र अस्त्र घडावें. त्या अस्त्रानें तो दैत्य मरेल; एरवीं कोटी प्रयत्न केले तरी कांहीं उपाय चालावयाचा नाहीं. इंद्र

ह्मणाला–देवा ! उपाय सांगितलात खरा; परंतु ऋषीच्या अस्थी कशा प्राप्त होतील ? जिवावर सर्वांचीच प्रीती असते, ऋषी प्राण कसा सोडील ? हा उपाय मला कठिण दिसतो. विष्णु ह्मणाला–भगवद्भक्त दयेचे समुद्र होत; त्यांस देहाची आशा नसून परोपकारीं प्राण खर्ची घालतील.

नंतर इंद्रानें विष्णूस वंदन करून, आज्ञा मागून, मनोवेगानें ऋषीजवळ येऊन नमन केलें; त्याचें तेज पाहतांच, इंद्राला बोलावयाची लाज वाटूं लागली. हें योगिराजानें जाणून इंद्रास विचारिलें कीं, हे अमरपाळा ! कां आला आहेस ? इंद्र बोलला–असुरानें प्रळय मांडला असून त्याचें मरण तुमच्या आस्थीनें होईल, असें ब्रह्मदेवानें नेमिलें आहे, ह्मणून अस्थी मागण्याकरितां आलों आहें. तें ऐकून ऋषि हांसून विनोदानें ह्मणाला–धन्य तुझा विचार, कीं जीवंतपणींच अस्थी मागतोस ! माझा प्राण घेऊन असुरास मारूं पाहतां ? हें तुमचें देवांचें स्वार्थी देवपण ! मग मनुष्यास काय ह्मणावें ? ऋषीचें वचन ऐकतांच, इंद्राची मती कुंठित होऊन श्वास टाकित विचार करूं लागला कीं, ऋषी तर ज्ञानाच्या गोष्टी सांगतो पुढें याच्या अस्थी मिळणार कशा व असुर मरणार कसा ! बरें ऋषीला बळेंच वधावें तर शापून भस्म

करील. 'पुढें वाघ व मागें विहीर' अशा चिंतासागरांत इंद्र बुडून गेला.

इंद्राचें धैर्य खचलें असें जाणून, त्यास अभय देऊन ऋषि ह्मणाला—तुझ्याकरितां प्राणत्याग करितों, तरी माझ्या अस्थीच्या वज्रानें दैत्याचें मर्दन कर. ऋषीची अभय वाणी ऐकतांच इंद्राला चौपट लाभ वाटून, रंक राज्यावर बसावा, तसा मनाला संतोष झाला. निपुत्रिकास पुत्र व्हावा, प्राण जातांना अमृत मिळावें, कामुकाला वारांगना मिळावी, नारदाला कळ सांपडतांच पोटांत गुदगुली व्हावी किंवा मोहराचें गाठोडें दुर्बळाला अकस्मात् सांपडावें, तसा इंद्राला हर्ष झाला. नंतर ऋषीनें योगसाधनानें समाधि लावून प्राण-ज्योतिष परब्रह्मी मिळवून देहत्याग केला. तेव्हां इंद्रानें त्याच्या अस्थींचें वज्र करून वृत्रासुरास मारिलें. हें सांगावयाचें कारण इतकेंच कीं, परोपकारी पुरुष धन्य होत, त्यांची कीर्ति पुराणांत व्यास वाल्मिकांनीं वर्णन केली आहे.

इतकें चिल्हयाबाळ बोलून आईस ह्मणाला—माते आतां विलंब लावूं नये भुकेनें योगी पीडला आहे. त्याची क्षुधा शांत कर. मुलाचें वचन ऐकतांच; चांगुणेनें पोटाशीं धरून, गहिंवर सांवरून उचलून घरांत आणिला व आडवा धरून पतीच्या हातांत खड्ग दिलें. राजानें शिवस्मरण करून पुत्राचें शरीर

चिरून तुकडे करून दिल्यावर चांगुणेनें त्याचा पाक तयार केला. पात्र वाढितांच, योगी मौन धरून बसला. तेव्हां चांगुणा ह्मणाली–दयावंता! आतां अन्यायाची माफी करून आपल्या आत्म्याची शांति करावी. चांगुणेचा प्रेमा पाहतांच, शिवानें मस्तक डोलवून ह्मटलें–चांगुणे, पवित्र शीर ठेवून अपवित्र धडाचा पाक केलास? तर आतां शीर उखळांत घालून कांड व गाणें गा. आणि मग पाक कर. शीर कांडतांना खेद मानून गहिंवरशील, नेत्रांत अश्रु आण-शील तर मी न जेवितां उठून जाईन.

असें शंकर बोलतांच चांगुणा ह्मणाली–बरें तर तुह्मी क्षणभर शांत बसा, तुमच्या आज्ञेप्रमाणें मी करितें. मग शिवास नमस्कार करून पुत्राचें शिरकमळ उखळांत घालून मुसळानें कांडूं लागली. ती म्हणाली– माझ्या सगुण सुंदरा सकुमारा चिल्हया बाळा! तुला मुसळघायानें कुटीत आहें मी ज्या हातांनीं तुला कुरवाळलें, त्याच हातांनीं कांडितें. "हें तुला आईला उचित काय?" असें तूं म्हणत असशील तरी आतां राग सोडून मातेच्या कल्याणाची इच्छा धर. नंतर पार्व-तीची प्रार्थना केली कीं, गिरिजेमाई! माझी तुला करुणा येऊं दे. माझ्या तान्हया चिल्हयाबाळास प्रेमपान्हा पाजून कैलासीं सांभाळ कर. इतके दिवस मी पाळून, हे दयावंते मायबहिणी!

तुझ्या ओटींत घातला आहे, त्याला क्षणभर विसंबूं नको. मग बाळास म्हणाली– तुला स्वर्गी कसें करमेल ? भुकेलास किंवा तान्हेलास म्हणून कोण ह्मणेल ? व कडेवरून कोण खेळवील ? असें बोलतांच गहिंवर येऊन मोहाची उकळी आली व स्तनांतून दुग्धधारा सुटून हातांतलें मुसळ निसटलें तरी विवेक व धैर्य धरून, चंद्रमौळीचें स्मरण करून, मोह जिरवून म्हणाली– मी वेडी आहें उगाच मुलासाठीं चडफडून देवाची गोडी सांडून मोहानें नाडलें ? कोणाची कन्या व कोणाचे पुत्र ! या मिथ्या मायेच्या मोहसूत्रानें तुझें माझें हा भेद होतो.

असें बोलून चांगुणेनें शीर कांडून पाक केला व ताट वाढून स्वामीस जेवावयास सांगूं लागली. तिचें वचन ऐकतांच, शंकर हांसून म्हणाले–तुम्ही दोघेंही उपवाशी आहां तर तुमच्या शिवाय मला अन्न गोड कसें लागेल ? माझें वचन मान्य करून, उभयतां भोजनास बसाल तरच मी भोजन स्वीकारीन. शिवाची विलक्षण वाणी ऐकतांच, श्रियाळास धाक बसून स्त्रीस म्हणाला–हा हट्टास पेटला आहे पोटच्या बाळास मारवून, त्याचें मास भक्षण्यास सांगत आहे हें राक्षसी कर्म आपण करूं नये. असा राजाचा विचार ऐकतांच चांगुणा पतीचा हात धरून म्हणाली–मी चिल्हयास नऊ महिने

उदरांत सांठविला, मग एक दिवस सांठविण्यास जड तें काय ? यास्तव पंक्तीस बसून स्वामीस संतोष करूं या: नंतर उभयतां विकल्प सोडून, पंक्तीस बसतांच, शंकर उठले व जावयास निघाले: आणि म्हणाले-निपुत्रिकाचें अन्न भक्षून आपलें सुकृत वेचणें हा पवित्र धर्म नव्हे. हें पाहून चांगुणेनें शंकराचे चरणावर मिठी घालून म्हटलें-मींच अभाग्य करंटी होय:

नंतर शिवानें चांगुणेची भक्ति पाहून, दिव्यरूप दाखवून बालकास सजीव करून, जनकजननीस भेटविला व " प्रसन्न झालों वर माग " असें म्हणाला. शिवाचें रूप पाहतांच, उभयतांनीं चरण वंदन केलें व चांगुणा म्हणाली-दीनदयाळा मला छळलें असें दुसरे कोणास कसोटीस लावूं नका. असें वचन ऐकून, शिवानें अभय वर देऊन, सर्व परिवारासह विमानांत बसवून कैलासास नेलें. असा शंकराचा प्रताप वर्णन करितां करितां शेषाचीं सहस्र मुखें शीण पावलीं. अशाप्रकारें ऋषींच्या सत्रांत श्रियाळचरित्र सांगण्यांत आलें. याच्या श्रवण-पठनानें संतति, संपत्ति विद्या धन यांची प्राप्ती होऊन, शेवटीं कैलासप्राप्ती होते.

समाप्त.

# पुस्तकें विक्रीस तयार.

| | रु. आ. पै. |
|---|---|
| भजनी मेळा .... .... .... .... | ०—१२—० |
| भजनी भारूड .... .... .... .... | ०—१२—० |
| एकनाथी भारूड .... .... .... .... | ०—१२—० |
| प्रेमदायक भजन .... .... .... .... | ०—२—० |
| अंष्टकवि भजन .... .... .... .... | ०—८—० |
| दत्तस्तवनामृत .... .... .... .... | ०—४—० |
| स्मशानगमनाचें भजन .... .... .... | ०—४—० |
| भाविक भजन .... .... .... .... | ०—१—० |
| देवाचें भजन .... .... .... .... | ०—१—० |
| गुंडोजी महाराजाचें भजन .... .... .... | ०—१—० |

**पुरंदरे आणि कंपनी,**

बुकसेलर्स आणि पब्लिशर्स,

माधवबाग—मुंबई.

# विक्रीस तयार.

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| साध्वी स्त्रियांचीं चरित्रें | ० | १२ | ० |
| ,, भाग २ रा | ० | १२ | ० |
| श्री तुकाराम चरित्र | ० | १२ | ० |
| गोपीचंद चरित्र | ० | ३ | ० |
| दामाजीपंताचें चरित्र | ० | २ | ० |
| हरिश्चंद्र राजाचें चरित्र | ० | २ | ० |
| स्त्रियांचीं गाणीं | ० | ४ | ० |
| पाकशास्त्र | ० | ८ | ० |
| कहाण्या | ० | १२ | ० |
| रांगोळीचें पुस्तक | ० | ४ | ० |

## पुरंदरे आणि कंपनी.

बुकसेलर्स आणि पब्लिशर्स,

माधवबाग-मुंबई.

नंबर ४.